# महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम, 1999

**1. संक्षिप्त नांव.**

या नियमांना महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन व विवाह नोंदणी नियम, 1999 असे म्हणावे.

**2. व्याख्या.**

या नियमामध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, –

(क) ''नमुना'' याचा अर्थ, या नियमांना जोडलेला नमुना, असा आहे;

(ख) ''विधेयक'' याचा अर्थ, महाराष्ट्र विवाह मंडळाचे नियमन व विवाह नोंदणी विधेयक, 1998, असा आहे;

(ग) ''कलम'' याचा अर्थ, या विधेयकाचे कलम असा आहे;

(घ) या नियमांमध्ये वापरण्यात आलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना या विधेयकामध्ये अनुक्रमे जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल.

**3. विवाह मंडळाची नोंदणी करण्यासाठी अर्ज.**

1) विवाह मंडळाचा प्रत्येक मालक, व्यवस्थापक, भागीदार, विश्वस्त किंवा त्याची प्रभारी व्यक्ती किंवा विवाह मंडळ चालविण्याची इच्छा असणारी किंवा विवाह मंडळ चालविणारी कोणतीही व्यक्ती किंवा व्यक्तींचा गट, ज्याच्या स्थानिक अधिकार क्षेत्रात असे मंडळ असेल किंवा तयार होणार असेल त्या निबंधकाकडे, नमुना **''अ''** मध्ये मंडळाची नोंदणी करण्यासाठी अर्ज करील.

2) पोट-नियम (1) खालील अर्जासोबत रु.5,000/- इतके शुल्क भरण्यात येईल.

3) अर्जासोबत पुढील दस्तऐवज जोडलेले असतील –

(एक) मंडळ एखादी विश्वस्त संस्था असेल, तर विश्वस्त विलेखाची प्रत,

(दोन) कोणतीही असल्यास, भारतीय निवडणूक आयोगाने दिलेली, ओळखपत्राची प्रत, किंवा शिधापत्रिकेची प्रत अथवा अर्जदाराची ओळख पटविणारा आणि अर्जदाराच्या वास्तव्याच्या ठिकाणाचा आणि मंडळाचे नोंदणीकृत कार्यालय म्हणून विवाह मंडळाचे कार्यालय ज्या ठिकाणी स्थित असेल, त्या ठिकाणाचा नि:संशय पुरावा असणारा इतर कोणताही दस्तऐवज :

परंतु, निबंधक, त्याच्या स्वेच्छानिर्णयात अर्जदारांची ओळख पटविण्यासाठी, पुरेसा पुरावा म्हणून आणि निवासाचा आणि अशा मंडळाच्या कार्यालयीन जागेचा पुरावा म्हणून अर्जासोबत इतर कोणताही दस्तऐवज सादर करण्यास परवानगी देऊ शकेल.

(4) पोट-नियम (3) अन्वये सादर करण्यात आलेले दस्तऐवज, अर्जदाराची ओळख पटविण्यासाठी किंवा अर्जदाराच्या निवासाचे ठिकाण किंवा मंडळाचे नोंदणीकृत कार्यालय म्हणून मंडळाचे कार्यालय ज्या ठिकाणी असेल, ते ठिकाण असल्याचे सिध्द करणारा नि:संशय पुरावा नाही असे निबंधकाचे मत झाले असेल, तर नोंदणी प्रमाणपत्र देण्याकरिता निबंधकाची खात्री पटण्याच्या प्रयोजनार्थ, निबंधकास आवश्यक वाटेल, अशी अन्य कागदपत्रे किंवा दस्तऐवज सादर करण्यासाठी निबंधक अर्जदारास निदेश देऊ शकेल. अशी आणखी कागदपत्रे किंवा दस्तऐवज सादर केल्यावर निबंधकाची खात्री पटल्यास, निबंधक विवाह मंडळ म्हणून अशा मंडळाची नोंदणी करु शकेल आणि नमुना **‘‘ब’’** मध्ये नोंदणी प्रमाणपत्र देऊ शकेल.

(5) जर अर्जदाराच्या ओळखीबाबत किंवा अशा मंडळाच्या कार्यालयाच्या जागेबाबत निबंधकाची खात्री पटली नसेल तर, निबंधक अर्जदाराचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आणि अर्ज फेटाळण्यासंबंधीची लेखी कारणे नमूद केल्यानंतर नमुना **‘‘क’’** मध्ये मंडळाची नोंदणी करण्यास नकार देणारा आदेश देऊ शकेल.

(6) पोट-नियम (4) अन्वये नोंदणी करण्यात आलेल्या विवाह मंडळाच्या नोंदणीचे तशाच प्रकारे नूतनीकरण करता येईल.

**4. नोंदणी रद्द करणे.**

या विधेयकाच्या किंवा नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन करुन एखाद्या विवाह मंडळाची कामे सुरु आहेत, असे निबंधकास कळविण्यात आले असेल तर किंवा त्याच्या निदर्शनास आले असेल तर, अशा मंडळास कारण दाखविण्याची आणि / किंवा त्याचे म्हणणे ऐकून घेण्याची संधी दिल्यानंतर, अभिकथित नियमबाह्यतेबद्दल किंवा या विधेयकाच्या किंवा नियमांच्या तदतूदींचे उल्लंघन केल्याबद्दल खात्री करुन घेतल्यानंतर निबंधक लेखी कारणे नमूद केल्यानंतर नमुना **‘‘क’’** मध्ये अशा मंडळाची नोंदणी रद्द करणारा आदेश देऊ शकेल.

**5. विवाह नोंदणीची कार्यपध्दती.**

1) विवाह नोंदणीचे प्रत्येक, ज्ञापन, नमुना **''ड''** मध्ये असेल.

2) ज्ञापनासोबत रु.15/- इतके शुल्क देण्यात येईल.

3) ज्ञापनासोबत पुढील दस्तऐवज जोडलेले असतील :

(एक) शिधापत्रिकेची प्रत किंवा असल्यास भारताच्या निवडणूक आयोगाकडून देण्यात आलेले ओळखपत्र किंवा पक्षकार आणि साक्षीदार यांचे मालक इत्यादींकडून देण्यात आलेले पारपत्र किंवा ओळखपत्र इत्यादींसारखे अन्य कोणतेही दस्तऐवज;

(दोन) पक्षकारांचा जन्म दाखला, किंवा शाळा सोडल्याचा दाखला.

(तीन) असल्यास कोणतीही लग्नाची निमंत्रणपत्रिका :

परंतु, निबंधक त्यांच्या स्वेच्छानिर्णयात, पक्षकारांची आणि साक्षीदारांची ओळख आणि त्यांच्या निवासस्थानाचे ठिकाण नि:संशयपणे सिध्द करण्यासाठी पुरेसा पुरावा म्हणून ज्ञापनासोबत अन्य कोणतेही दस्तऐवज सादर करण्याची परवानगी देऊ शकेल.

(4) ज्ञापन सादर केल्यानंतर व त्याची पडताळणी केल्यानंतर आणि पक्षकार व साक्षीदार यांच्या ओळखीबाबत खात्री पटल्यानंतर निबंधक नमुना **''इ''** मध्ये विवाह नोंदणीचे प्रमाणपत्र देऊ शकेल.

(5) ज्ञापनामध्ये देण्यात आलेला तपशील आणि पक्षकारांनी आणि साक्षीदारांनी सादर केलेले दस्तऐवज आणि कागदपत्रे पक्षकारांची किंवा साक्षीदारांची किंवा त्या दोघांचीही ओळख नि:संशयपणे पटवू शकत नाहीत असे निबंधकाचे मत झाले असेल, तर निबंधक, नोंदणी प्रमाणपत्र देण्यासाठी त्याच्याकडून मागविण्यात येतील असे दस्तऐवज किंवा कागदपत्रे वाजवी वेळेत सादर करण्यासाठी पक्षकारांना निदेश देऊ शकेल. अशी कागदपत्रे आणि दस्तऐवज सादर करण्यात आल्यानंतर व अशा दस्तऐवजांची किंवा कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर त्याची खात्री पटल्यावर निबंधक, नमुना **''इ''** मध्ये विवाह नोंदणी प्रमाणपत्र देऊ शकेल.

(6) पक्षकारांच्या किंवा साक्षीदारांच्या ओळखीबाबत किंवा ज्ञापनामध्ये देण्यात आलेल्या निवेदनाच्या खरेपणाबद्दल निबंधकाची खात्री पटली नसेल तर, निबंधक, पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आणि लेखी कारणे नमूद केल्यानंतर, विवाहाची नोंदणी करण्यास नकार देणारा आदेश देऊ शकेल. नकाराचा आदेश नमुना **''फ''** मध्ये असेल.

**6. अपील मिळाल्यानंतरची कार्यपध्दती.**

नोंदणी करण्यास नकार देण्याच्या आदेशासंबंधी निबंधकाकडून विधेयकाच्या कलम 7 च्या पोट-कलम (2) अन्वये निर्देश मिळाल्यानंतर सात दिवसांच्या आत महानिबंधक, व्यथित झालेल्या पक्षकारांना त्याची बाजू स्पष्ट करण्याची नोटीस दिल्याच्या तारखेपासून सात दिवसांपेक्षा कमी नसेल अशा मुदतीत नोटीशीत दिलेल्या तारखेत व वेळी त्यांना आपल्या समोर हजर होण्यास फर्माविणारी एक नोटीस नमुना **"ग"** मध्ये पाठवील.

**7. नोंदणी करण्यास विलंब केल्याबद्दल शास्ती :**

1) विवाह शास्त्रोक्त पध्दतीने केलेल्या परंतु शास्त्रोक्त पध्दतीने केल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीत, नोंदणी न केलेल्या विवाहाची, ते पक्षकार सर्वसाधारणपणे ज्या निबंधकाच्या स्थानिक अधिकार क्षेत्रात राहात असतील त्या निबंधकाकडून, **रुपये पन्नास इतकी शास्तीची रक्कम** भरल्यानंतर, नोंदणी करता येईल, आणि नियम 5 खालील विवाह नोंदणीच्या संबंधातील कार्यपध्दती अशा नोंदणीस लागू होतील.

2) विवाह शास्त्रोक्त पध्दतीने केल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीनंतर सादर करण्यात आलेल्या विवाह नोंदणीसंबंधीच्या ज्ञापनाची, शंभर रुपये इतकी शास्तीची रक्कम भरल्यानंतर, नियम 5 मध्ये तरतूद केल्याप्रमाणे नोंदणी करता येईल.

**8. निबंधकाने सर्व अर्ज आणि ज्ञापने सुरक्षित अभिरक्षेत ठेवणे :**

निबंधक, एखाद्या विवाह मंडळाच्या नोंदणीचा किंवा तिचे नूतनीकरण प्रत्येक अर्ज आणि त्याला मिळालेले प्रत्येक ज्ञापन सुरक्षित अभिरक्षेत ठेवील. असा अर्ज किंवा ज्ञापन ते मिळाल्याच्या तारखेपासून साठ वर्षाच्या कालावधीसाठी जतन करण्यात येईल. आणि कोणत्याही न्यायालयाने लेखी आदेश दिल्याशिवाय ते त्याच्या कार्यालयातून हलविण्यात येणार नाही.

**9. नोंदवहीचा नमुना :**

1) निबंधक, विवाह मंडळाची वार्षिक नोंदवही, नमुना **"ह"** मध्ये ठेवील.

2) निबंधक, वार्षिक विवाह नोंदवही, नमुना **"ई"** मध्ये ठेवील.

**10. प्रमाणित प्रत दाखल करुन घेणे –**

1) हिंदू विवाह अधिनियम, 1955 (155 चा 25) या अन्वये करण्यात आलेली हिंदू विवाह आणि घटस्फोट नियम, 1955 याच्या नियम (22) अन्वये घटस्फोटाच्या रद्दबातल प्रत्येक हुकूमनाम्याची, विवाह केल्याच्या किंवा विवाह विघटन केल्याच्या प्रत्येक

हुकूमनाम्याची निबंधकास मिळालेली प्रत्येक प्रत, ती विवाह नोंदवहीमध्ये दाखल करील आणि असा विवाह या अधिनियमान्वये नोंदविण्यात आलेला असेल तर, अशा हुकूमनाम्याची समुचित ठिकाणी नोंद करण्यात येईल.

2) प्रत्येक महिन्याच्या पाचव्या दिवशी किंवा त्यापूर्वी निबंधक, पुढील नमुन्यामध्ये प्रमाणित प्रतीमधील उतारा नोंदणीकृत डाकेने महानिबंधकास पाठवील :

**''घटस्फोट किंवा विवाह रद्दबातल करण्याच्या किंवा विवाहाचे विघटन करण्याच्या हुकूमनाम्याच्या प्रमाणित प्रतीमधील उतारा''**

| पतीचे नांव | निवासाचे ठिकाण | पत्नीचे नांव | निवासाचे ठिकाण | विवाहाचे ठिकाण व तपशील | हुकूमनाम्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| | | | | | |

दिनांक :

विवाह निबंधक

**11. नोंदवह्यांची तपासणी करणे आणि त्यांच्या प्रमाणित प्रती मिळविणे.**

1) सर्व जनतेला पाहण्यासाठी नोंदवह्या खुल्या ठेवण्यात येतील. नोंदवही पाहण्याची इच्छा असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, त्याबाबत निबंधकाकडे अर्ज केल्यावर व पाच रुपये इतके शुल्क भरल्यावर, ती पाहता येईल.

2) नोंदवहीच्या उता-याची प्रमाणित प्रत मिळण्याची इच्छा असलेली कोणतीही व्यक्ती, त्याबाबत निबंधकाकडे अर्ज करील आणि प्रत्येक प्रतीकरिता रुपये दहा इतके शुल्क भरील.

**12. फी जमा करणे.**

निबंधकास मिळालेली सर्व शुल्कांची व शास्तीची रक्कम, शासकीय कोषागारात जमा करण्यात येईल.

**13. ज्ञापनाचे नमुने पुरविणे.**

1) ज्ञापनाचे कोरे नमुने निबंधकाकडून विवाहातील पक्षकारांना मोफत पुरविण्यात येतील.

2) निबंधक, कोणत्याही पुरोहितास, तलाठ्यास, पाटलास, शाळेच्या शिक्षकास किंवा कोणत्याही नगरपरिषदेस किंवा महानगरपालिकेस कोरे नमुने वाजवी संख्येत मोफत पुरवील. परंतु, असा पुरोहित, तलाठी, पाटील, शाळेचा शिक्षक, नगरपरिषद किंवा महानगरपालिका यांनी अशा नमुन्यांचा अतिरिक्त पुरवठा करण्याची विनंती करतेवेळी, नमुन्यांचा हिशेब देण्याची हमी दिली पाहिजे.

**14. नोंदवह्या व अभिलेख यांचे जतन करणे.**

1) खालील नमूद केलेले अभिलेख व कागदपत्रे, त्यांच्यासमोर दिलेला कालावधी संपल्यानंतर नष्ट करण्यात येतील :

| | अभिलेखाचे नांव | कालावधी (वर्षामध्ये ) |
|---|---|---|
| (अ) | पावती पुस्तक | पाच वर्ष |
| (ब) | महानिबंधकांना पाठविलेल्या निर्देशांच्या संबंधातील पोस्टाच्या पोच पावत्या. | पाच वर्ष |
| (क) | नोंदवहीमधील उता-याचे अर्ज | पाच वर्ष |
| (ड) | रोकड वही | पाच वर्ष |
| (इ) | कोरी पुस्तके आणि नमुने यांचे हिशेब | तीन वर्ष |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

## नमुना- ''अ''

### विवाह मंडळाची नोंदणी / नोंदणीचे नूतनीकरण करण्याकरिता अर्ज

[ कलम 5 (1) आणि (4) आणि नियम 3 पाहा ]

द्वारा :

प्रति,

(अर्जदाराचे नांव व पत्ता)

| | |
|---|---|
| ............................... | ........................... |
| ............................... | ........................... |
| ............................... | ........................... |
| (कायमस्वरुपी पत्ता) | (सध्याचा पत्ता) |

प्रति,

निबंधक,
विवाह मंडळ व विवाह नोंदणी,

महोदय,

मी, उपरोल्लिखित अर्जदार, खालील विवाह मंडळाच्या नोंदणीकरिता/नोंदणीचे नूतनीकरण करण्याकरिता अर्ज करु इच्छितो :

विवाह मंडळाचे नांव आणि पूर्ण पत्ता

......................................................

(मंडळाचे नोंदणीकृत कार्यालय ज्या ठिकाणी असेल किंवा होणार असेल ते ठिकाण)

.......................................................

2. मी यासोबत खालील दस्तऐवज जोडीत आहे :

(एक) ........................................

(दोन) ........................................

(तीन) ........................................

ज्या अटींस व शर्तीस अधीन राहून नोंदणी करण्यात येईल अशा सर्व अटी व शर्ती माझ्यावर / आमच्यावर बंधनकारक असतील, यास मी / आम्ही वचनबध्द आहे / आहोत.

आपला विश्वासू

ठिकाण :

दिनांक : (अर्जदाराची स्वाक्षरी)

## **नमुना- ''ब''**

### **विवाह मंडळ नोंदणी / नोंदणीचे नूतनीकरण केल्याचे प्रमाणपत्र**

[ कलम 5 (2) आणि (4) आणि नियम 3 पाहा ]

प्रमाणित करण्यात येते की, **नमुना- ''अ''** मध्ये सादर केलेल्या अर्जानुसार श्री.................................................... रा. ....................... यांच्या .................... येथे नोंदणीकृत कार्यालय असलेल्या (नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता) विवाह मंडळाची महाराष्ट्र विवाह मंडळाचे नियमन व विवाह नोंदणी विधेयक, 1998 या मधील तरतुदीनुसार आणि मागील पृष्ठावरील अटींस व शर्तीस अधीन राहून, मी नोंदणी केली आहे.

सदर प्रमाणपत्र .....................19 .... ........ पर्यन्त ग्राह्य आहे.

............................ विवाह मंडळाचे ................................. चे नोंदणीकृत कार्यालय,

शिक्का

ठिकाण :

स्वाक्षरी

(अटी आणि शर्ती)

दिनांक :

या प्रमाणपत्राचे ...............................पर्यंत नूतनीकरण करण्यात आलेले आहे.

**शिक्का**

दिनांक :

स्वाक्षरी

ठिकाण :

## नमुना- ''क''

### विवाह मंडळाची नोंदणी / नोंदणीचे नूतनीकरण करण्यास नकार देणारा आदेश

[ कलम 5 (6) व नियम 3 (5) पाहा ]

मी, विवाह मंडळाच्या निबंधक, ............................................................ अर्जाची व त्यासोबत सादर केलेल्या इतर सर्व दस्तऐवजांची व कागदपत्रांची छाननी केल्यानंतर, आणि दिनांक ------/------/ 19---- रोजी अर्जदाराचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, सदर विवाह मंडळाची नोंदणी करण्यास / नोंदणीचे नूतनीकरण करण्यास खालील कारणास्तव नकार देत आहे :

..................................................................................................

..................................................................................................

ठिकाण :

दिनांक : विवाह मंडळाचे निबंधक,

शिक्का

## नमुना- ''ड''

### विवाहाचे ज्ञापन

[ कलम 6 आणि नियम 5 पाहा ]

1. विवाहाचा दिनांक : ............................................................................
2. विवाहाचे ठिकाण : ............................................................................
   (संपूर्ण तपशीलासह)
3. पक्षकारांमधील विवाह ज्या व्यक्तिगत कायद्यान्वये विधी संपन्न झाला तो
   कायदा :..............................................................................................
4. (क) पतीचे नांव :..........................................................................
   (प्रथम आडनावासह संपूर्ण नांव)

   (ख) पतीला दुस-या नावाने (कोणतेही असल्यास) :....................................
   ओळखत असल्यास ते नांव / ती नावे : .......................................

   (ग) धर्म (एक) जन्माने ....................................................................
   (दोन) दुसरा धर्म स्वीकारला असल्यास (कोणताही असल्यास) :
   ............................................................................

(घ) विवाह विधी ज्या तारखेस संपन्न ........... वर्ष ...............महिना .......
झाला असेल त्या तारखेस असलेले वय ...................

(ड) व्यवसाय कार्यालयाच्या पत्त्यासह : .............................................

(च) विवाहाच्या वेळची स्थिती : ............. अविवाहीत/विधुर/घटस्फोटित

(छ) पतीचा संपूर्ण पत्ता : .................................................

(ज) पतीची तारखेसह स्वाक्षरी : .................................................

5\. (क) पत्नीचे नांव (लग्नापूर्वीचे नांव) : .................................................
(प्रथम आडनावासह संपूर्ण नांव)

(ख) पत्नीला दुस-या नावाने (कोणतेही असल्यास) ओळखत असल्यास ते नांव / नावे : ....................................................

(ग) धर्म (1) जन्माने .............................................
(2) दुसरा धर्म स्वीकारला असल्यास (कोणताही असल्यास) : ....................................................

(घ) विवाह विधी ज्या तारखेस संपन्न झाला असेल त्या तारखेस असलेले
वय : .................. वर्ष ....... महिना ............

(ड) विवाहाच्या वेळची स्थिती : .......... अविवाहित/विधवा/घटस्फोटीत

(च) विवाहाच्या पूर्वीचा अथवा वेळचा पत्नीचा
पूर्ण पत्ता : .......................................

(छ) पत्नीची तारखेसह स्वाक्षरी ................................

6\. साक्षीदार : (1)(एक) नांव ................................
(दोन) पत्ता ................................
(तीन) व्यवसाय आणि कार्यालयाचा पत्ता ..................
(चार) विवाहित जोडप्याशी असलेले नाते ............................
(कोणतेही असल्यास)
(पाच) तारखेसह स्वाक्षरी :- ................................

(2) (एक) नांव ................................
(दोन) पत्ता ................................
(तीन) व्यवसाय ................................
(चार) विवाहित जोडप्याशी असलेले नाते...............................
(कोणतेही असल्यास)
(पाच) तारखेसह स्वाक्षरी :- .........................

(3)(एक) नांव ..................................

(दोन) पत्ता ..................................

(तीन) व्यवसाय ..................................

(चार) विवाहित जोडप्याशी असलेले नाते ..........................
(कोणतेही असल्यास)

(पाच) तारखेसह स्वाक्षरी ..................................

7. पुरोहित :- (अ) पुरोहिताचे नांव : ..................................

(ब) पूर्ण पत्ता : ..................................

(क) धर्म : ................................

(ड) वय : ..................................

(इ) तारखेसह स्वाक्षरी : ..................................

8. या ज्ञापनासोबत सादर केलेले दस्तऐवज :

(1) ..................................

(2) ..................................

(3) ..................................

(4) ..................................

9. निबंधकाकडे सादर केल्याचा दिनांक :

टिप :- कोणत्याही व्यक्तीने ज्ञापनामध्ये केलले कोणतेही विधान किंवा प्रतिज्ञापत्र जे खोटे असेल अथवा सादर केलेला कोणताही दस्तऐवज, जे खोटे असल्याचे त्याला / तिला माहित असेल अथवा जे खोटे असल्याचे मानण्यास कारण असेल, तो / ती व्यक्ती कलम 12 अन्वये दंडनीय कारवाईस पात्र ठरेल.

**नमुना- ‘‘इ’’**

**विवाह नोंदणीचे प्रमाणपत्र**

[ कलम 6 (1) आणि नियम 5 पाहा ]

प्रमाणित करण्यात येते की, पतीचे नांव :- ................................................ राहणार ................................ आणि पत्नीचे नांव ...................................... राहणार ................................ यांचा विवाह दिनांक.............रोजी ........... (ठिकाणी) येथे विधीसंपन्न झाला. त्याची महाराष्ट्र विवाह मंडळाचे नियमन व विवाह नोंदणी विधेयक, 1998 अन्वये ठेवण्यात आलेल्या नोंदवहीच्या खंड क्रमांक ..................... च्या अनुक्रमांक .................. वर, दिनांक .............................. रोजी मी नोंदणी केली आहे.

शिक्का

ठिकाण :

स्वाक्षरी
विवाह निबंधक

दिनांक :

## नमुना- ‘‘फ’’

### विवाहाची नोंदणी करण्यास नकार देण्याबाबत आदेश

[ कलम 7 आणि नियम (6) पाहा ]

मी, विवाह मंडळाच्या निबंधक, ............................................................ ज्ञापनाची आणि ज्ञापनासोबत सादर केलेल्या अन्य सर्व दस्तऐवजांची छाननी केल्यानंतर, आणि दिनांक ........................ रोजी पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, विवाहाची नोंदणी करण्यास खालील कारणास्तव नकार देत आहे :

..........................................................................................................

..........................................................................................................

शिक्का

ठिकाण :

स्वाक्षरी
विवाह निबंधक

दिनांक :

## नमुना- ‘‘ग’’

[ कलम 7 (2) आणि नियम 6 पाहा ]

नोंदणीकृत डाकेने

दिनांक :- ..../ ..../ ......

द्वारा :

महानिबंधक,
विवाह मंडळ नियमन व विवाह नोंदणी,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

विषय :- महाराष्ट्र विवाह मंडळाचे नियमन व विवाह नोंदणी विधेयक, 1998 च्या कलम 7 च्या पोट-कलम (2) च्या अंतर्गत निबंधक .......................... (ठिकाण) यांच्या कडील निर्देश.

प्रति,

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | पतीचे नांव | :- | ............................................... |
| | (पत्ता) | :- | ............................................... |
| (2) | पत्नीचे नांव | :- | ............................................... |
| | (पत्ता) | :- | ............................................... |
| (3) | साक्षीदाराचे नांव | :- | ............................................... |
| | (पत्ता) :- | | ............................................... |
| (4) | साक्षीदाराचे नांव | :- | ............................................... |
| | (पत्ता) :- | | ............................................... |
| (5) | साक्षीदाराचे नांव | :- | ............................................... |
| | (पत्ता) :- | | ............................................... |

ज्याअर्थी, निबंधक, विवाह मंडळ आणि विवाह ........................................ (ठिकाण) यांनी ...................... (पती) आणि ........................... (पत्नी) या दोघांच्या ...........................या ठिकाणी विधिसंपन्न झालेल्या विवाह नोंदणीस नकार दर्शविला आहे आणि महाराष्ट्र विवाह मंडळाचे नियमन व विवाह नोंदणी विधेयक, 1998 (1998 चा महाराष्ट्र विधेयक क्र. ....) कलम 7 च्या तरतुदीनुसार माझ्याकडे निर्देश केला आहे;

त्याअर्थी, आता, उक्त विधेयकाच्या कलम (8) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, निबंधकांनी दिलेला आदेश कायम करण्यात येऊ नये. याची कारणे देण्याबाबत, मी, याद्वारे, .......................... या दिवशी .............................. वाजता मध्यान्हपूर्व / मध्यान्होत्तर, खालील पत्त्यावर माझ्या समक्ष हजर राहण्यासही फर्मावित आहे.

2. आपल्या दाव्याच्या पृष्ठ्यर्थ, आपण आपल्याला दिलेल्या दिवशी, वेळी व ठिकाणी अतिरिक्त दस्तऐवज आणि साक्षीदार आणू शकतात.

3. ठरल्यानुसार, आपण उपस्थित न राहिल्यास, त्याविषयी आपणास काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरण्यात येईल व महानिबंधक योग्य ते आदेश देतील.

दिनांक :

स्वाक्षरी
महानिबंधक,

## नमुना- ''ह''

### विवाह मंडळांची नोंदवही

[ कलम 5 (2) आणि नियम 9 पाहा ]

............. या वर्षाची विवाह मंडळाची नोंदवही

| अनुक्रमांक | मंडळाचे नांव आणि पत्ता | मंडळ चालविणा-या व्यक्तीचे नांव आणि पत्ता |
| --- | --- | --- |
| | | |

## नमुना- ''आय''

### विवाह नोंदवही

[ कलम 6 (1) (इ), 8 आणि नियम 9 पाहा ]

............. या वर्षाची विवाह नोंदवही

| अनु क्रमांक | विवाहाचा दिनांक व ठिकाण | पतीचे नांव व पत्ता | विवाहाच्या वेळचे त्यांचे वय | पतीचा धर्म | पत्नीचे नांव व पत्ता | विवाहाच्या वेळचे तिचे वय | पत्नीचा धर्म | नोंदणीची तारीख | शेरा |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) | (10) |
| | | | | | | | | | |